Estd.1962

NACC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व शिक्षक, व प्रसाशकीय अधिकारी, व सेवकांना कळविण्यात येते की, जावक क्रमांक आस्थापना /७९१ दिनांक १५ मार्च २०२० रोजीच्या परिपत्रकाव्दारे करोना विषाणु संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व संसर्ग पसरू नये याकरिता खबरदारीचा उपाय म्हणुन सोमवार दिनांक १६ मार्च २०२० पासुन पुढील आदेश होईतोपर्यंत विद्यापीठ कार्यालयातील शिक्षक,प्रशासकीय अधिकारी, व सेवकांची बायोमेट्रीक थंब इम्प्रेशनव्दारे घेतली जाणारी दैनंदिन हजेरी स्थगित करण्यात येत असलेचे कळविण्यात आले होते.

यास्तव आदेशान्वये कळविण्यात येते की, बायोमेट्रीक थंब इम्प्रेशनव्दारे घेतली जाणारी दैनंदिन हजेरी दिनांक १५/०२/२०२१ पासुन पुन्हा सुरू करण्यात येत आहे याची सर्व संबधितानी नोंद घ्यावी. यानुसार सर्व संबधीतांनी आपल्या विभागाच्या इमारतीतील बायोमेट्रीक मशिनव्दारेच थंब इम्प्रेशन करणेचे आहे. अन्यत्र थंब इम्प्रेशन केलेचे आढळलेस सेवा नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

विद्यार्थी भवन, युसिक, सी.एफ.सी. व विद्यापीठ मुद्रणालय,या अधिविभागातील थंब इम्प्रेशन मशिन पुर्ववत चालु होईतोपर्यंत या अधिविभागातील सेवकांनी त्यांच्या विभागाच्या जवळच्या इमारतीतील बायोमेट्रीक मशिनव्दारे थंब इम्प्रेशन करणेचे आहे.

सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवकांनी थंब इम्प्रेशन करण्यापुर्वी व केलेनंतर सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक आहे, तसेच दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवुन थंब इम्प्रेशन करावयाचे आहे. तसेच कोवीड विषाणुचा प्रसार होऊ नये म्हणुन आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्यात यावी.

विद्यापीठास नॅक पियर टिम भेट देण्याचा कालावधी निश्चित झाला असलेने महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१ एप्रिल २०२०, दिनांक ११ जुन २०२०, व २३ जुलै २०२० च्या शासन निर्णयानुसार ज्या अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन उपस्थिती बाबत सुट देण्यात आलेली होती अशा सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयास करोना विषाणु प्राद्रुर्भावाच्या अनुषगांने योग्य ती खबरदारी घेऊन कार्यालयात १०० टक्के उपस्थित राहाणे आवश्यक आहे.

सर्व अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी आपल्या विभागातील थंब इम्प्रेशन मशिनच्या ठिकाणी सॅनिटायझरची सोय करावी. याकरीता सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागांनी आपल्या विभागासाठी ७० टक्के अल्कोहोल असलेले सॅनिटायझर प्रशासकीय मान्यता घेवुन आपापल्या विभागाच्या लेखाशिर्षकामधुन खरेदी करावे. तसेच केंद्र/राज्य शासन/जिल्हा प्रशासन यांनी कोवीड १९ बाबत पारीत केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे.

या कार्यालयाच्या जा. क्र. आस्थापना /७९१ दिनांक १५ मार्च २०२० रोजीच्या परिपत्रकाव्दारे कळविल्यानुसार विद्यापीठ कार्यालयातील सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील नियमित सेवेतील शिक्षक, व शिक्षेकेतर सेवकांची दिनांक १४/०२/२०२१ पर्यंतची मुळ दैनंदिन हजेरीपत्रके दिनांक १५/०२/२०२१ रोजी आस्थापना विभागात तात्काळ जमा करावीत.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ ५४६.

दिनांक 12 FEB 2021

प्रति,

१. मा.कुलगुरू/प्र—कुलगुरू/कुलसचिव/संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ/वित्त व लेखाधिकारी यांचे कार्यालय

२. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स, व सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परीपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षेकेतर सेवकांचे निदर्शनास आणावे.

३. प्रभारी संचालक, संगणक केंद्र यांना :— माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाही साठी